# दहा दिवसीय ‘आव्हान-२०१७’ शिबीरास विद्यापीठात उत्साही प्रारंभ



'आव्हान-२०१७' शिबिराच्या पहिल्या दिवशी सहभागी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना शुभेच्छा देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर डावीकडून विद्यापीठाचे एनएसएस कार्यक्रम समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीआरएफचे निरीक्षक श्री. सी.डी. इंगळे, एनएसएसचे राज्य संकर्प अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के



'आव्हान-२०१७'मध्ये राज्यभरातून सहभागी झालेले राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक.



## आपत्काळात बचावकर्त्यांची स्वसुरक्षाही महत्त्वाची: कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

कोल्हापूर, दि. १ जून: कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी आपत्तीत सापडलेल्यांना वाचविणे जितके महत्त्वाचे तितके त्यांना मदतीसाठी जाणाऱ्यांनी स्वतःची सुरक्षा जपणेही महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज सकाळी येथे केले.

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती यांचे कार्यालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या 'आव्हान-२०१७' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरास आज सकाळी ठीक नऊ वाजता यजमान शिवाजी विद्यापीठाच्या प्रशस्त लोककला सभागृहात प्रारंभ झाला. राज्यभरातून आलेल्या राष्ट्रीय येवा योजनेच्या सुमारे १२०० स्वयंसेवकांच्या प्रचंड उत्साहात पहिल्या दिवशीच्या प्रशिक्षण सत्रास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीआरएफचे निरीक्षक सी.डी. इंगळे, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड उपस्थित होते.